**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग,**
**आयुक्त, अर्थ व सांख्यिकी,**
**नवीन प्रशासन भवन, १८ वा माळा,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.**
ईमेल : commissioner.es@maharashtra.gov.in/ cro.des-mum@gov.in

---

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई या कार्यालयात राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या संशोधन अधिकारी (गट-ब राजपत्रित) संवर्गातील व्यक्तींकडून संशोधन अधिकारी या पदासाठी करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती करण्यासाठी अर्ज मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | विवक्षित कामाचे स्वरुप | सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे पदनाम | वय, पात्रता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम | संशोधन अधिकारी | १) वयोमर्यादा कमाल ६५ वर्षांपर्यंत<br>२) संचालनालयाच्या संशोधन अधिकारी/सांख्यिकी अधिकारी पदावरुन निवृत्त<br>३) मुख्यमंत्री फेलोशिप सारख्या कार्यक्रमाच्या कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक | १ |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती:-**

१) सदर नियुक्ती शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि. १०/०६/२०२५ मधील तरतूदीनुसार करण्यांत येतील.

२) करार पध्दतीने नेमणूक करताना सेवानिवृत्त अधिकाऱ्यास नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मूळ निवृत्ती वेतन (अंशराशीकरण मूल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रकम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. तसेच सदर शासन निर्णयानुसार आर्थिक लाभ देण्यांत येतील.

३) सदर नियुक्ती केवळ १२ महिन्यांच्या कालावधीकरिता असेल.

४) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

५) नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

७) इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज भरुन आवश्यक त्या अनुभवाच्या प्रमाणपत्रासह पोस्टाच्या RPAD सेवेद्वारे ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत संचालनालयास पाठविण्यात यावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करण्यात येणार नाही. विभागास आवश्यक असलेली पात्रता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्र व्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

८) मुंबई शहर व उपनगर, ठाणे, नवी मुंबई क्षेत्रातील अर्जदाराने कृपया करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज करावा.

९) मुलाखतीव्दारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार संचालनालयाचा राहील.

१०) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रशासकीय इमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),मुंबई ४०००५१ येथे काम करावे लागेल.

११) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्ती अधिकारी आयुक्त, अर्थ व सांख्यिकी, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१२) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**संपर्क:- अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रशासकीय इमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१**

**अर्जाचा नमुना**

अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रशासकीय इमारत, ८ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या संशोधन अधिकारी (गट-ब राजपत्रित) संवर्गातील सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी नियुक्ती

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव:-

२. अर्जदाराचा संपूर्ण पत्ता:-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम:-

४. भ्रमणध्वनी क्रमांक:-

५. जन्म दिनांक व वय:-

६. संचालनालयास आवश्यक पात्रता अर्जदाराकडे आहे का? होय/नाही

७. अनुभव:- ------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी